# वन-अतिक्रमण हटविणेबाबत करावयाची कायदेशीर कारवाई

वन जमिनीवर अतिक्रमण हा एक गंभीर गुन्हा असून मनुष्याच्या जमिनीच्या वैयक्तिक लोभामुळे निसर्गाचे अ तात्पर्याने समाजाचे मोठे नुकसान होत आहे. याकरिता विविध कायद्या अंतर्गत वनअतिक्रमण हटविण्याची कारवाई करता येऊ शकते.

१. जर अतिक्रमण वन विभागाच्या अख्तारीयात असलेल्या कोणत्याही प्रकारच्या जमिनीवर म्हणजे राखीव, संरक्षित वा झुडपी जंगलावर असेल तर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९७३ चे अंतर्गत कारवाई करता येऊ शकते.
२. जर अतिक्रमण राखीव वनावर असेल तर भारतीय वन कायदा १९२७ चे कलम २६ नुसार कडक कारवाई करता येवू शकते.
३. जर अतिक्रमण वन्यजीव संरक्षित क्षेत्रावर असेल तर वन्यजीव कायदा १९७२ चे कलम ३४ A नुसार कारवाई करता येवू शकते.

परंतु वरील तीनही कायदे जसे १. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९७३, २. भारतीय वन कायदा १९२७ व ३. भारतीय वन्यजीव कायदा १९७२ या तिघांचे अवलोकन केले असता काही ठळक बाबी समोर येतात:

१. म.ज.म.सं. १९७३ या कायद्यात अतिक्रमण काढण्याची प्रक्रिया पूर्णतः दिली आहे. सदर प्रक्रिया नैसर्गिक न्याय तत्वांना अनुसरून असून जर पूर्णतः पालन केले तर कोणत्याही न्यायालयात सदर प्रक्रियेला आव्हान दिले तरी प्रक्रिया निर्दोष सिद्ध होते व निकाल विभागाचे बाजूने लागतो व लागल्याची अनेक उदाहरणे आहेत. परंतु इतर दोन कायद्यामध्ये अतिक्रमण काढण्याची अशी सविस्तर प्रक्रिया दिलेली नाही. भा.व.का. १९२७ मध्ये तर राखीव वनातील अतिक्रमण काढण्याचे पूर्ण अधिकार व.र.कास दिले आहे. सदर कायद्यांद्वारे प्रक्रियेचे पालन न करता केलेली अतिक्रमण कारवाई कितपत न्यायालयात उभी राहू शकेल याबाबत सांशकता आहे.
२. भा.व.का. १९२७ मधील कलम २६ मधील २६(४) नवीन तरतुदीनुसार अतिक्रमण काढताना जर अतिक्रमण धारकाने अथवा कोणीही विरोध केला तर त्यांना अटक करून कारवाई करता येते. सदर गुन्हेगार ६ वर्षाच्या सक्त मजुरी करिता पात्र असून गुन्हा अजामीनपात्र आहे.
३. वरील तीनही कायदे वन जमिनीचे कायदेशीर स्टेटस पाहून लावणे आवश्यक आहे. जर अतिक्रमित जागा संरक्षित (PROTECTED AREAS) वनातील रखीव वने असेल तर तिन्ही कायद्यापैकी कोणत्याही कायद्याने कारवाई करता येवू शकते.
४. अतिक्रमणासोबत झाडे तोडणे, करवा करणे, सीमा पिलर हलविणे वा नष्ट करणे, या गुन्ह्याकरिता त्याच प्र.गु.री. मध्ये कलमे लाऊन कारवाई करता येवू शकते.

Scanned by CamScanner

अतिक्रमणाच्या बाबतीत करावयाची प्राथमिक कारवाई:-

१. वन अतिक्रमणाचा प्रथम गुन्हा रिपोर्ट जारी करण्यात यावा. यात अतिक्रमित क्षेत्राचे वन जमिनीचा हुद्दा जसे संरक्षित वन, राखीव वन, अभयारण्य इत्यादी नमूद करण्यात यावे. प्र.गु.री. मध्ये योग्य ती भा.व.का. १९२७ वा व.जी.का. १९७२ ची कलमे लावण्यात यावी. गुन्हा उघडकीस आला ती दिनांक व वेळ नमूद करावी. वनखंड क्र., नियतक्षेत्र, वर्तुळ इत्यादीचा व्यवस्थित उल्लेख करावा.
२. अतिक्रमित क्षेत्राचे जी.पी.एस. द्वारे पॉलीगॉन घेण्यात यावे व त्याची सी.डी. सोबत जोडण्यात यावी.
३. पंचनामा करताना क्षेत्राची चातुर्सिमा व्यवस्थित नोंदवावी. अतिक्रमित क्षेत्राचे चलचित्रण करण्यात यावे. सदर चलचित्रण कोणी व कोणत्या कॅमेराचे सहाय्याने केले याबाबतचा उल्लेख पंचनाम्यात करण्यात यावा.
४. आरोपीचे व साक्षीदारांचे बयान चल-चित्रित करावे. जर त्याकरिता वेगळ्याने कॅमेरा उपलब्ध नसेल तर मोबाईल च्या कॅमेराचा वापर करून चलचित्रण केले तरी चालेल.
५. संबंधित वनरक्षकाचे बयान वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी नोंदवावे.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९७३ चे अंतर्गत कारवाई:-

कोणत्याही वन जमिनीवर अथवा वन विभागाचे मालकीचे जमिनीवर अतिक्रमण असल्यास ते अतिक्रमण हटविण्यासाठी सहाय्यक वनसंरक्षकाना जिल्हाधिकाऱ्यांचे अधिकार प्राप्त झाले आहे. याकरिता महाराष्ट्र शासनाने परिपत्रक जारी करून सर्व सं.व.स. यांना अधिकार दिले आहेत. याकरिता पुढील प्रमाणे कारवाई करण्यात यावी:

A. वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी संपूर्ण अतिक्रमणाची केस वरीलप्रमाणे कागदपत्रे लाऊन सहाय्यक वनसंरक्षक यांना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९७३ आणि/किंवा भारतीय वन कायदा १९२७ आणि/किंवा वन्य जीव संरक्षण कायदा १९७२ अंतर्गत कारवाई करिता सादर करावी.
B. सं.व.स. यांनी त्यांचे कार्यालयात प्रकरणानुसार प्रत्येक प्रकरणा करीता एक अशी फाईल तयार करावी. सं.व.स. यांनी सदर केस वर अतिक्रमण धारक यांना करणे दाखवा नोटीस जारी करावी. अशा नोटीस अतिक्रमण धारक स्वीकारत नसल्याचे सर्व साधारणपणे दिसून येते. याकरिता अशा नोटीसेस व.प.अ. यांना बजावण्यास देण्यात याव्या. व.प.अ. यांनी नोटीस बजावून अतिक्रमण धारकाची त्यावर नोटीस मिळाल्याची पावती घ्यावी. जर अतिक्रमण धारक नोटीस स्वीकारण्यास मनाई करीत असेल तर संबंधित नोटीस गावाच्या पोलीस पाटलाला देऊन पोलीस पाटलाची सही घेऊन त्यास नोटीस बजाविण्यास सांगता येऊ शकते. तसेही शक्य नसल्यास व.प.अ. यांनी सदर नोटीस गावातील प्रतिष्ठित पंचासमक्ष त्याचे घराचे दर्शनी भागास चिटकवून तसा पंचनामा करू शकतात. तसेच याच नोटीस ची दुसरी प्रत रजिस्टर वा स्पीड पोस्टने अतिक्रमण धारकास विभागीय कार्यालयातूनच पाठवावी व पोस्टाची पावती संबंधित फाईलला जोडून ठेवावी. नोटीस मध्ये अतिक्रमण धारकास त्याचे म्हणणे मांडण्याकरिता साधारणतः २० दिवसांच्या अंतराने एका तारखेस सुनावणी करिता बोलवावे. (जेणेकरून

Scanned by CamScanner

अतिक्रमण धारकास नोटीस मिळाल्यानंतर तयारी करिता १० दिवसांचा अवधी मिळेल) जर अतिक्रमण धारक सुनावणीच्या दिवशी हजर राहू शकत नसेल तर तो सुनावणीच्या आधी वा सुनावणीच्या १५ दिवसानंतर त्याचे म्हणणे लिखित स्वरुपात व.प.अ. कार्यालय वा सं.व.स. कार्यालयात (अतिक्रमण धारकाच्या सुविधेनुसार) देऊ शकतो अशी लेखी सूचना कार्यालयाच्या पत्त्यांसह नोटीस मध्ये असावी.

C. अतिक्रमण सुनावणीचे दिवशी अतिक्रमण धारकास नोटीस बजावल्याची पावती व.प.अ. यांचेकडून घ्यावी व संबंधित फाईलला जोडावी. अतिक्रमण धारकाकडे असलेले अतिक्रमित जमिनीचे पुराव्यांची पडताळणी करावी. असे पुरावे असल्यास त्यावर व.प.अ. यांना विचारणा करावी व त्यांचे म्हणणे नमूद करावे. दोन्ही बाजूचे (अतिक्रमण धारक व व.प.अ.) म्हणणे PROCEEDING म्हणून त्याचे फाईल मध्ये नमूद करावे. त्यावर त्यांची सही घ्यावी. सही करण्यास मनाई केल्यास PROCEEDING मध्ये तसे नमूद करावे. शक्य असल्यास PROCEEDING चे चलचित्रीकरण करावे. जर अतिक्रमण धारकाकडे ७/१२ असेल व सिमेविषयी वाद असेल तर सर्वे कक्षाला त्याबाबत लेखी विचारणा करून त्यांचा अहवाल घ्यावा.

D. जर अतिक्रमण धारकाने वनहक्क कायदा २००६ अंतर्गत दावा दाखल केला असेल तर विभागीय कार्यालयातील संबंधित कक्षाकडून (सर्वे/गुन्हे) त्या दाव्याच्या सद्य स्थितीबद्दल रिपोर्ट घ्यावा व तो अतिक्रमण धारकाच्या फाईलला जोडावा. जर अतिक्रमण दावा प्रलंबित असेल तर अतिक्रमण निर्मूलनाचे आदेश जारी करू नये.

E. अतिक्रमण धारकाच्या दाव्याची पडताळणी करणे करीता गुगल अर्थ (GOOGLE EARTH) या SOFTWARE चा निष्णात उपयोग करता येवू शकतो. अतिक्रमणाच्या जी.पी.एस. पॉलीगॉनचे २००३, २००७ व आत्ता असलेले तीन / चार छायाचित्रे उपलब्ध होऊ शकतील. सदर छायाचित्रात जमिनीचा वापर त्या त्या वर्षी कशासाठी केला जात होता हे तत्काळ लक्षात येते. (साधारणतः आत्ता असलेली सर्व अतिक्रमणे २००७ व नंतर केलेली आहेत. कारण पूर्वीची जुनी अतिक्रमणे वनहक्क कायदा २००६ अंतर्गत नियमित करण्यात आलेली आहे.) अशी छायाचित्रे प्रिंट करून संबंधित अतिक्रमण धारकाच्या फाईलला जोडावी. सदर नकाशा चित्रे न्यायालयात व वनहक्क समिती मध्ये सुद्धा मांडले जाऊ शकते. डिटेल समजण्याकरिता लेखाच्या शेवटी स्क्रीन शॉट्स द्वारे प्रक्रिया देण्यात आलेली आहे.

F. वरील सर्व बाजूंचा उहापोह करून सं.व.स. अथवा उं.व.स. यांनी एक जबाबदार निकाल देणे अपेक्षित आहे. प्रत्येक प्रकरणात दोन्ही बाजू व्यवस्थित नमूद करून, जर आ. न्यायालयाचे काही निकाल असतील तर त्यांचे संदर्भ देऊन निकाल देण्यात यावा. जर निकालात अतिक्रमण धारकास स्वतःहून अतिक्रमण हटविण्याची संधी देण्यात येऊन तसा १५-३० दिवसांचा अवधी देण्यात यावा. त्यानंतर हि अतिक्रमण न हटल्यास व.प.अ. यांना अतिक्रमण हटविण्याचे आदेश निकालात असणे अभिप्रेत आहे. जर वनहक्क दाव्यात प्रकरण नामंजूर झाले असेल तर तसा उल्लेख निकालात असणे आवश्यक आहे. ज्या पुराव्यांमुळे निकाल देण्यात आला, त्यांचा सविस्तर उहापोह निकालात केला पाहिजे.

G. अतिक्रमण निकालाची नोटीस अतिक्रमण धारकास व व.प.अ. यांना बजाविण्यात यावी. अतिक्रमण धारकास व.प.अ.मार्फत व पोस्टा मार्फत सदर नोटीस बजाविण्यात यावी.

Scanned by CamScanner

H. अतिक्रमण हटविन्याकामी स्थानिक पोलिसांची लेखी मदत व.प.अ. यांनी मागावी. जरी मदत मिळणार नसेल तरी लेखी मदत मागावी व त्याची पावती सोबत ठेवावी. जेणेकरून अतिक्रमण हटविण्याची कायदेशीर कारवाई आपण करीत आहोत याची माहिती पोलिसांना आहे याचा लेखी पुरावा आपल्याकडे राहतो. व आपल्यावर खोटी विरोधी तक्रार पोलीस स्टेशन मध्ये झाल्यास FIR दाखल होत नाही.

I. अतिक्रमण काढताना चे सर्व चलचित्रण करावे. गावातील VEDC वा JFMC चे मेम्बर ला सोबत घ्यावे. अतिक्रमण निर्मुलन मोहिमे दरम्यान वन कर्मचार्यांची संख्या भरपूर ठेवावी. गरज भासल्यास शेजारील वनपरीक्षेत्राचा स्टाफ मदतीला घ्यावा. गावात काय हालचाली चालू आहे यावर बारीक नजर ठेवावी. जर मोठ्या प्रमाणात विरोध होणार असेल तर तसे सं.व.स. वा उं.व.स. यांना कळवावे. पूर्ण तयारीनिशीच अतिक्रमण काढावे. माघार घ्यावी लागेल असे वाटत असेल तर अतिक्रमण निर्मुलन प्रक्रिया टाळावी. दुसर्या तारखेस अतिक्रमण काढण्यास घ्यावे. किंवा छुप्या पद्धतीने थोडे थोडे अतिक्रमण  तोडावे / काढावे. ज्या ठिकाणी गावातील लोक जास्त जमतील असे अतिक्रमण शेवटी काढावे. गावात जर दोन गट असतील तर त्याचा फायदा करून घ्यावा.

J. एवढे करूनही जर अतिक्रमण निर्मुलनास विरोध झाला तर तो मोडून काढावा. भा.व.का. १९२७ चे कलम २६(४) अंतर्गत प्र.गु.री जारी करून विरोध करणार्यांना अटक करावी व न्यायालय दाखल करावे. न्यायालयाच्या लक्षात आणून द्यावे कि भा.व.का. दुरुस्ती २०१३ नुसार २६(४) हा अजामीनपात्र व ६ वर्षाच्या गंभीर शिक्षेस पात्र आहे. केलेले चलचित्रण न्यायालयात दाखल करावे. जर आरोपी पुन्हा वनअतिक्रमण क्षेत्रात जाणार नाही असे न्यायालयात कबुल करीत असेल तर त्याच अटीवर त्याला जामीन देण्यात यावा असे प्रतिपादन न्यायालयास करावे.

K. हटविलेले अतिक्रमण क्षेत्रात तत्काळ CCT वा मनरेगा अंतर्गत कामे घ्यावीत. सीमा पिलर उभे करून घ्यावेत. अतिक्रमण हंगामात दवंडी पिटवून अतिक्रमण करण्यापासून परावृत्त करावे. अतिक्रमण करणार्यांवर गंभीर कायदेशीर कारवाई होईल असे सांगावे. आग हंगामात शक्यतो तातडीची गरज असल्याशिवाय अतिक्रमण निर्मुलन हाती घेऊ नये.


L. अतिक्रमण धारकांनी जर न्यायालयात धाव घेतली तर निष्णात वकिलांचा वापर करून केसेस खारीज करून घ्यावे. भा.व.का. १९२७ नुसार राखीव वनातील अतिक्रमण प्रकरणात  दिवाणी न्यायालयास हक्क नाही. न्यायालयात आपले म्हणणे व्यवस्थित मांडावे, सर्व पुरावे दाखल करावे.

M. EDC व JFM समित्यांमधून अतिक्रमणाबाबत प्रबोधन करावे. लोकांना रोजगाराच्या संधी उप्लाद्भ करून द्याव्या. अतिक्रमण धारकांना EDC / JFM समित्यांच्या लाभापासून दूर ठेवावे. लोकांची नाडी ओळखून समाजाच्या उत्कार्षाकरिता शक्य तेवढे कार्य करावे.


Scanned by CamScanner

# <u>अतिक्रमणाच्या उच्चाटनात गुगल प्रतीमेंचा वापर कसा करावा</u>

१. जी.पी.एस द्वारे घेतलेले पॉलीगॉन गुगल अर्थ किंवा गुगल अर्थ प्रो वर DRAG व DROP करून टाकावे.





२. त्यानंतर डाव्या वरच्या कोपर्यात टूल मेनू मधील घड्याळाचे चित्र क्लिक करावे





Scanned by CamScanner

३. डाव्या वरच्या कोपर्यात एक टाईम लाईन उघडेल. सदर टाईम लाईन वरील कर्सर २००६ वर घेऊन गेला असता २००६ ला त्या जमिनीवर काय होते याचे चित्र उघडेल.




Scanned by CamScanner

४. सदर चित्र तत्काळ FILE मेनू मध्ये जावून SAVE मध्ये SAVE IMAGE केल्यानंतर एक बॉक्स उघडेल




५. या बॉक्स मध्ये आपल्याला नकाशास नाव देता येईल. बॉक्स मधील SAVE IMAGE चे बटन दाबल्यावर इच्छित स्थळी नकाशा सेव होईल.


Scanned by CamScanner

६. अशाच पद्धतीने २००९, २०१३ व २०१६ करिता नकाशा चित्रे काढता येतील. सदर नकाशास SCALE नाही परंतु सदर IMAGE जमिनीपासून किती फूट अंतरावरून घेण्यात आलेली आहे ते नकाशात नमूद असते.





७. अशा ३-४ नकाशा चित्रांची तुलना करून अतिक्रमणाबाबत चांगला पुरावा मिळतो.

८. उदाहरणार्थ:




Scanned by CamScanner







Scanned by CamScanner




सदर नकाशे भारतीय पुरावा कायदा १८७२ चे कलम ६५B चे प्रमाणपत्र जोडून न्यायालयात दाखल करता येते.

---

---

---

विशाल हनुमंत माळी
सहाय्यक वनसंरक्षक
ताडोबा (कोर), चंद्रपूर.

Scanned by CamScanner